पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
गक्षेका/ ४ / कावि / ३९/२०१९
दिनांक : २६/०८ /२०१९

प्रति,
मा. ---- -------------
सदस्य/ सदस्या, ग प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
थेरगाव, पुणे-४११०३३

**विषय:** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची मासिक सभा **बुधवार दि.४/९/२०१९** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.ग प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार **दिनांक ४/०९/२०१९ रोजी सकाळी ११.००** वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह " येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग प्रभाग समिती
**कार्यपत्रिका क्रमांक ५**

**दिनांक: ४/०९/२०१९** वेळ: सकाळी **११.०० वाजता**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार **दिनांक ४/०९/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता** ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह " येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

विषय क्रमांक १) मा.क्षेत्रिय अधिकारी ग क्षेत्रिय कार्यालय यांचे जा.क्र.गप्र/वि/१/११२/२०१९ दि.२९/०७/२०१९ चे पत्रानुसार ग क्षेत्रिय कार्यालयाकरीता आवश्यकतेनुसार विद्युतीकरणाचे काम करणेकामी प्रस्तुतचे र.रु.१०,००,०००/- फक्त पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २) मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १६/०८/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील जिजामाता हॉस्पिटलचे नुतनीकरण करण्यात आले आहे. सदर ठिकाणी बाल शिवाजी व जिजाऊ मॉसाहेब (शिवनेरी किल्ल्यावरील प्रतिकृती) यांचा पुतळा माझ्या वतीने महानगरपालिकेस भेट स्वरुपात देण्याचा मानस आहे. तरी सदरील पुतळा महापालिकेमार्फत जिजामाता हॉस्पीटलच्या आवारामध्ये सुशोभीकरण करुन बसविण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३) मा.झामाताई बारणे यांचे दिनांक ५/०८/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२४ येथील वाकड पोलिस स्टेशन ( आयईवना सोसायटी) समोरील चौकास लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे. थेरगाव डांगेचौक येथील बीआरटी रस्त्यावरील उड्डाणपुलावर छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचे नाव दिलेले आहे, सदर परिसर (चौक) डांगे चौक या नावाने संपुर्ण शहरात ओळखला जातो. तरी पुलावरती डांगे चौक नावाचा उल्लेख करावा, सदर दोन्ही ठिकाणाचे नावाचे फलक तयार करुन लवकरात लवकर लावण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव -३३
क्र.गक्षेका/कावि/४/ ३९ /२०१९

दिनांक -   २६ / ०८ /२०१९